नि.दि.दा.क्र. २१५/२०१०
गोरखनाथ वि. मोहन
नि.क्र.११४

दावा दुरुस्तीनंतर

वादी करीता साक्षीदार क्र.1 यांची जबानी

प्रतिवादीकरीता उलटतपास विधिज्ञ श्री. सी. जे. सबनीस यांचेकडून

१. मोहन माझे चुलते आहेत. माझे मुळ गाव धानोरा आहे. भूमापन क्रं.३६ आणि ९ मधील जमिनी आमच्या वडीलांनी खरेदी घेतलेल्या आहेत. मोहन यांच्या निलंगा येथील मिळकतीबाबत मला प्रस्तुत दाव्यात काहीही तक्रार नाही. मोहन यांच्या निलंगा शिवाय इतर ठिकाणी असलेल्या मिळकतीबाबतही मला काहीही तक्रार नाही. माझ्या वडीलांनी ज्या खरेदी खताद्वारे जमिनी घेतल्या ते खरेदी खत माझ्या समक्ष झालेले नाही. माझ्या वडीलांनी ज्या वेळी जमिनी खरेदी केल्या त्यावेळी आमच्यात वाटप झालेले नव्हते हे म्हणणे खरे आहे. मोहन हे काही कालावधी करिता विदेशात कमविण्यासाठी गेले होते हे म्हणणे खरे आहे. माझ्या वडीलांनी ज्यावेळी जमिनी खरेदी घेतल्या त्यावेळी मी जन्मलो नव्हतो. मी जन्मलो नसल्यामुळे माझे वडील व त्यांच्या भावांमध्ये दावा मिळकतीबाबत काय व्यवहार व घडामोडी झाल्या हे मला व्यक्तिश: माहित नाही हे म्हणणे खरे आहे. चतुसिमांच्या चुकामुळे दाव्यात दुरुस्ती केली आहे. दाव्यातील चुकीच्या चतुसिमा चुकीच्या आहेत असे सांगून, दावा दुरुस्त करुन त्याचा गैरफायदा घेण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2026.02.27 11:18:33 +0530

(रवि वि. पांडे)

दिनांक २६/०२/२०२६

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,निलंगा.
निलंगा, जि.लातूर